# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दि.२५/८/२००९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१२) इतिवृत्त**
**(दि.२४/८/२००९ ची तहकुब सभा)**

मंगळवार, दिनांक २५ ऑगष्ट २००९ रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **सकाळी ११.३५ वाजता** 'वंदे मातरम्' या गिताने सुरू झाली. या सभेस उप आयुक्त(म)श्री. उध्दव घुगे, नगर सचिव श्री. एम.ए.पठाण यांचेसह संबंधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.

०१. श्री. कटकटे सतीश विश्वनाथ
०२. श्री. जावेद हसन खान
०३. श्री. गवळी रविकांत काशीनाथ
०४. श्री. देसरडा प्रशांत सुभाष
०५. श्रीमती मेहरून्नीसा खान हमीद खान
०६. श्री. पांडे विनायक प्रभाकर
०७. श्री. सोनवणे कचरू श्रीपत
०८. श्री. निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
०९. सौ. मोमीन सफिया फिरदौस

**संवाद :**

मा.सभापती : बैठकीला जे अधिकारी गैरहजर आहेत त्यांची लिस्ट तयार करण्यात यावी व जे अधिकारी गैरहजर असतील त्यांचा एक दिवसाचा पगार कपात करण्यात यावा.

श्री.सतिष कटकटे : यापुर्वीच्या बैठकीत जे अधिकारी गैरहजर होते त्या अधिकाऱ्यांचा पगार कपात करण्याचा निर्णय या सभागृहाने घेतला होता त्याची अंमलबजावणी झाली का?

मा.सभापती : जे अधिकारी गैरहजर आहे त्यांचा एक दिवसाचा पगार कपात करण्यात यावा. निषेधाचा ठराव करण्यात यावा तसेच शासनाकडे तसा ठराव पाठविण्यात यावा.

श्री.सतिष कटकटे : बैठकीस विभागांचे विभाग प्रमुख हजर नाहीत, सर्वांचा निषेध करून सभा रद्द करावी व शासनाला कळविण्यांत यावे.

मा.सभापती : स.सदस्य यांनी सांगीतल्या प्रमाणे आज बरेच विभाग प्रमुख बैठकीस हजर नाहीत. मा.आयुक्तांना वारंवार विनंती करून सुध्दा बैठकीस हजर नाहीत, सर्व विभाग प्रमुख आणि मा.आयुक्तांचा निषेध करून आजची सभा तहकूब करण्यात येते. दिनांक 26.08.2009 रोजी दुपारी 12.00 वाजता सभा

घेण्यात येईल  याची सर्वांनी नोंद घ्यावी. निषेधचा जो ठराव पारित केला तो मा.मुख्यमंत्री आणि नगर विकास मंत्री, मा.प्रधान सचिव यांना निषेधाचा ठराव त्वरीत आजच्या आज पाठविण्यात यावा. त्याबाबतची स्थायी समितीस माहिती द्यावी. स्थायी समिती आजच्या आज मा.प्रधान सचिव, मा.मुख्यमंत्री आणि मा.नगर विकास मंत्री यांना फॅक्स करतील आणि सभापती म्हणुन मी ही मा.प्रधान सचिव आणि मा.मुख्यमंत्री यांच्याशी या संदर्भात बोलतो की, औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये अशा प्रकारे काम चालते. सध्या स्वाईन फ्ल्यू ची साथ आहे, पावसाळा सुरू आहे, तसेच तीन मजली इमारत पडली. उपआयुक्त रात्री 11.30 वाजता फोन उचलतात परंतु वॉर्ड अधिकारी-अ हे फोन उचलत नाही. अशा पध्दतीने काम चालत असेल तर योग्य नाही. म्हणुन आजची सभा निषेध करून उद्या 12.00 वाजता ठेवण्यात येईल.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद